# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २६ ■ ऑगस्ट २०२५ ■ पाने : ८


# स्मार्ट काम, स्मार्ट संवाद, स्मार्ट परिणाम

## हितगुज



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

महावितरण ही जगातील सर्वात मोठ्या वीज वितरण कंपन्यांपैकी एक आहे. युरोपातील अनेक देशांच्या वीज वितरण क्षमतेशी महावितरण स्पर्धा करत आहे. आगामी पाच दहा वर्षात जर्मनी किंवा इंग्लंडसारख्या प्रगत देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विजेपेक्षा अधिक विजेचे वितरण महावितरण करेल. सव्वा तीन कोटी ग्राहक आणि रोजचा २५ हजार मेगावॅटच्या घरातील वीज पुरवठा असे महावितरणचे सध्याचे काम आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक आणि कृषी अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांना महावितरण वीज पुरवठा करते.

महावितरण समोरील आव्हाने इतरांपेक्षा मोठी आणि गुंतागुंतीची आहेत. नियमित वीज पुरवठा, वीज वितरण जाळ्याचे व्यवस्थापन, नियमित वीज बिल वसुली, पायाभूत सुविधा सुधारण्यासाठीच्या आरडीएसएससारख्या योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी सारखी अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांवर भर देणारी जगातील सर्वात मोठी गेम चेंजर योजना अशी विविध प्रकारची कामे आपण करत आहोत. पाच वर्षांसाठी विजेचे दर कमी करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणनेच केली आहे. विद्युत वितरण कंपनी म्हणून महावितरणची कामगिरी उंचावली आहे. कंपनीला विविध प्रकारचे अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. परंतु, आपल्याकडून वीज ग्राहकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. त्यानुसार आपल्याला आपली कामगिरी अधिक उंचावण्याची गरज आहे.

**स्मार्ट काम हवे** – महावितरणसमोरील आव्हाने ध्यानात घेता आपल्याला पारंपरिक पद्धतीने काम करून चालणार नाही तर कल्पक उपाय करून स्मार्ट काम करावे लागेल. महावितरण ही अभियंत्यांकडून चालविली जाणारी कंपनी आहे. कल्पकता हे अभियंत्यांचे वैशिष्ट्य आहे. आपल्यासमोरचे प्रश्न सोडविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करणे आणि कल्पक उपाय करून नेमके प्रयत्न करणे अशी स्मार्ट पद्धती आवश्यक आहे.

बिलिंगची कार्यक्षमता वाढविणे किंवा महसूल वाढविण्याचे उदाहरण घ्या. बिलिंग कसे होत आहे आणि बिलांची वसुली कशी होत आहे याच्या डेटाचे योग्य विश्लेषण केले तर नेमकी कोठे गळती होत आहे, हे समजेल आणि त्यावर उपाय करता येईल. बिलांच्या थकबाकीमुळे कायमस्वरुपी कनेक्शन तोडलेल्या पीडी ग्राहकांच्या बाबतीत सुद्धा हाच मुद्दा महत्त्वाचा आहे. डेटाचे विश्लेषण करणे आणि नेमके उपाय करणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे डेटाचे विश्लेषण केल्यानंतर त्यावर नियमित देखरेख करणे आणि समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे हे सुद्धा आवश्यक आहे. वीज पुरवठा नियमित आणि दर्जेदार होण्यासाठी सुद्धा शास्त्रीय दृष्टिकोन आवश्यक आहे. नेमक्या कोणत्या फीडरमधून होणारा वीज पुरवठा पुनःपुन्हा खंडित होतो, हे विश्लेषणाच्या आधारे शोधून काढले तर त्यावर उपाय करून परिणाम साधता येईल.

महावितरणच्या मासिक आढावा बैठकीची पारंपरिक चौकट मोडून मी त्या त्या प्रादेशिक विभागामधील विविध झोनमध्ये बैठक घेण्याची आणि या बैठकांना कार्यकारी अभियंत्यांपर्यंतच्या सर्वांना निमंत्रित करण्याची पद्धती मी सुरू केली आहे. या मागचा हेतूही त्या प्रादेशिक विभागानुसार नेमक्या समस्या निश्चित करून त्यावर तोडगा शोधण्याचा आहे. आपल्याला केवळ प्रयत्न करणे पुरेसे नाही तर परिणामही झाला पाहिजे व त्यासाठी नव्या कल्पक उपायांची गरज आहे.

**स्मार्ट संवाद हवा** – महावितरणच्या वीज ग्राहकांना या वर्षात एक महत्त्वपूर्ण भेट मिळाली आहे व ती म्हणजे स्मार्ट मीटर्स. सर्व ग्राहकांना हे मीटर मोफत देण्यात येत आहेत. स्मार्ट मीटरमुळे त्यांना अचूक वीजबिले मिळणार आहेत. विजेच्या वापराची नेमकी माहिती मिळणार आहे. तसेच दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे अतिरिक्त टीओडी सवलत मिळणार आहे. स्मार्ट मीटरचे इतके लाभ असताना काही व्यक्तींनी त्याबद्दल गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न चालविला आहे. आपण बसवत असलेले स्मार्ट मीटर हे प्रीपेड नसून सध्याच्या मीटर प्रमाणेच पोस्टपेड आहेत, हे आपण ग्राहकांना समजून सांगायला हवे. स्मार्ट मीटरबद्दलचे गैरसमज दूर करून त्याचे लाभ समजून देणे आवश्यक आहे. त्यासाठी स्मार्ट संवादाची गरज आहे.

सौर ऊर्जेच्या वापराच्या बाबतीत महावितरणने जागतिक पातळीवरील मोठे काम हाती घेतले आहे. त्याचा शेतकऱ्यांना आणि घरगुती ग्राहकांना थेट लाभ आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे, हे आपण जाणताच. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा व दर्जेदार वीज पुरवठा होण्यासोबतच एकूण अर्थव्यवस्थेत मोठे योगदान मिळणार आहे. आपापल्या क्षेत्रातील या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आपणच पुढाकार घ्यायला हवा.

सर्वसामान्य वीज ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या बाबतीतही ग्राहकांशी स्मार्ट संवाद साधून त्यांना योजनेचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्याची आवश्यकता आहे. महावितरणने हाती घेतलेल्या सौर ग्राम योजनेची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. प्रचलित योजनांचा अत्यंत कल्पकतेने वापर करून संपूर्ण गावाला ऊर्जा स्वतंत्र करणारी आणि वीजबिल मुक्त करणारी ही विशेष योजना आहे. त्याबाबतीतही स्मार्ट संवाद करून आपण लोकप्रतिनिधी, गावकरी आणि सरकारी यंत्रणेला सोबत जोडून घेऊन अधिकाधिक गावे सौर ग्राम करण्याची गरज आहे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा वेगाने विस्तार होण्यासाठी उद्योगांना नियमित आणि दर्जेदार वीज पुरवठा होणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण स्वागत सेल हा उपक्रम सुरू केला आहे. उद्योगांच्या बाबतीतही नियमित संवाद आणि वीज पुरवठ्याच्या समस्या वेळच्या वेळी सोडविणे महत्त्वाचे आहे.

**स्मार्ट परिणाम होईलच** – दरवर्षी कोणत्याही वस्तूचे किंवा सेवेचे दर वाढतच जातात असा आपला अनुभव आहे. तथापि, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने अचूक नियोजन करून आणि अपारंपरिक ऊर्जेवर भर देऊन वीजदर कमी करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याच पद्धतीने आकडेवारीचे योग्य विश्लेषण, समस्येचे नेमके निदान आणि समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला तर आपण आपल्यासमोरची आव्हाने पेलू शकतो. स्मार्ट काम आणि स्मार्ट संवाद असेल तर स्मार्ट परिणामही साध्य होईल, याची खात्री आहे.

# विदर्भामध्ये एक हजार वीजवाहिन्यांचे विलगीकरण व ७२७ उपकेंद्रांचे सक्षमीकरण

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र




▸▸ अकोला येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित नागपूर प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, प्रादेशिक संचालक परेश भागवत, सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे.

**सुधारित वितरण** क्षेत्र योजनेतून (आरडीएसएस) विदर्भात १००७ वीज वाहिन्यांच्या विलगीकरण तसेच इतर तांत्रिक कामांसह मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मधून ७२७ उपकेंद्रांच्या सक्षमीकरण व क्षमता वाढीचे कामे पूर्णत्वाकडे आहेत. त्यामुळे नवीन वीज जोडणीसह सर्व ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्यास प्राधान्य द्यावे. तसेच वीजहानी कमी करून वीजबिलांच्या वसूलीला आणखी वेग द्यावा. यात कोणतीही हयगय करू नये, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नागपूर प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

अकोला येथील नियोजन भवनात अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर व गोंदीया परिमंडलातील विविध कामे व योजनांसह प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, प्रादेशिक संचालक परेश भागवत, सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंते राजेश नाईक (अकोला), सुहास रंगारी (गोंदीया), दिलीप दोडके (नागपूर), हरिश गजबे (चंद्रपूर), अशोक साळुंके (अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले की, विदर्भात १ हजार ७ वीजवाहिन्यांच्या विलगीकरणाचे काम सुरू आहेत. त्यापैकी ३१४ वीजवाहिन्यांचे काम पूर्ण झाले आहे. उच्च व लघुदाबाच्या ३०८९ किलोमीटर वीजवाहिन्या, ९६७० किलोमीटर एरिअल बंच यासह इतर तांत्रिक कामे सुरु आहेत. ही कामे दर्जेदार व दिलेल्या मुदतीत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत विदर्भात १ लाख २ हजार १४५ घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असल्याने त्याचे वीजबिल शून्यवत झाले आहे. घरगुती ग्राहकांमध्ये या योजनेबाबत प्रबोधन करून लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिलाची शंभर टक्के वसूली तसेच तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करणे यावर आणखी भर द्यावा. गेल्या एप्रिलपासून वीजबिलांच्या थकबाकीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे संपूर्ण थकबाकीसह चालू वीजबिलांच्या वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. महसूलवाढ व वसूलीमध्ये हयगय केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल. महावितरणच्या सर्व ग्राहकसेवा वेबासाईट व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन उपलब्ध आहेत. ग्राहकांना विनाकारण कार्यालयात बोलावण्याऐवजी ऑनलाइन अर्जांद्वारे तत्पर सेवा द्यावी, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

**वीज दर कपातीचा उद्योगांना लाभ** – अकोला जिल्ह्यातील उद्योजकांशी लोकेश चंद्र यांनी विविध मुद्द्यांवर संवाद साधला. यावेळी एमएसईबी होल्डींग कंपनीचे स्वतंत्र संचालक आशिष चंदराणा उपस्थित होते. लोकेश चंद्र म्हणाले की, मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गेल्या अडीच वर्षांमध्ये ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीमुळे प्रथमच वीज दरात कपात झाली आहे. पुढील पाच वर्षांमध्ये लघु व उच्चदाबाच्या औद्योगिक वीज दरांत घट होत जाणार आहे अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी उद्योजकांच्या विविध वीज प्रश्नांवर चर्चा करून ते त्वरित सोडविण्यासाठी त्यांनी स्थानिक यंत्रणेला निर्देश दिले.

**आयएसओ मानांकीत ३३ केव्ही लोणी (टाकळी) उपकेंद्राला भेट** – अमरावती जिल्ह्याअंतर्गत लोणी (टाकळी) येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राने आयएसओ ९००१:२०१५ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन मिळवून परिमंडलातील पहिले ISO प्रमाणित उपकेंद्र बनण्याचा मान मिळवला आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी उपकेंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. उत्कृष्ट कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत उपकेंद्राच्या रजिष्टरला अभिप्रायाची नोंद करून उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे आणि त्यांच्या संपूर्ण चमूचे कौतूक केले.



▸▸ लोणी (टाकळी ) या ISO मानांकन प्राप्त उपकेंद्राच्या भेटीप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत अधिकारी.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेत प्रकल्पनिहाय समन्वय अधिकारी

## अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला



▸▸ पुणे येथे टास्क फोर्सच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला. समवेत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, संचालक योगेश गडकरी (वाणिज्य) व राजेंद्र पवार (मानव संसाधन).

**शेतकऱ्यांचे** जीवनमान उंचावणे व त्यांना दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजना आता अधिक वेगाने कार्यान्वित होत आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत, याकरिता प्रत्येक प्रकल्प व जिल्ह्यासाठी स्वतंत्र समन्वय अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत. या प्रकल्पासाठी काम करणाऱ्या एजन्सीनी विहित मुदतीत कामे पूर्ण करावीत. अन्यतः त्यांना पुढील ५ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्याचा इशारा राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी नागपूर, वर्धा, पुणे आणि नाशिक येथील आढावा बैठकांमध्ये दिली.

श्रीमती आभा शुक्ला यांनी या बैठकांमध्ये टास्क फोर्सच्या योजनेच्या जलद आणि यशस्वी अंमलबजावणीसाठी महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा केली. यात प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी, तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि वन विभागाशी संबंधित अडचणी दूर करण्यावर भर देण्यात आला. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीची उपलब्धता सुलभ करण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. खाजगी शेतजमीन मालकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी मिळणाऱ्या लाभांबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आदेशही श्रीमती शुक्ला यांनी दिले.

**विकासकांना वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश**

प्रकल्प विकासकांसोबत बैठक घेऊन श्रीमती आभा शुक्ला यांनी प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. प्रकल्पाच्या प्रगतीची नियमित नोंद योजनेसाठी तयार केलेल्या पोर्टलवर करण्याचे आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रकल्प वेळेत पूर्ण करणाऱ्या विकासकांना केंद्र शासनातर्फे प्रति मेगावॅट १ कोटी रुपये आणि राज्य शासनाकडून प्रतियुनिट २५ पैसे अनुदान मिळणार असल्याची माहितीही श्रीमती शुक्ला यांनी दिली. या योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या पोर्टलमध्ये विकासकांना जमिनीबाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेबाबत येणाऱ्या अडचणी मांडण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पोर्टलचा ॲक्सेस जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही देण्यात आला असून प्रकल्प उभारणीत येणाऱ्या समस्यांचे निराकरण तातडीने होण्यास मदत मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



▸▸ नागपूर येथे टास्क फोर्सच्या बैठकीत मार्गदर्शन करताना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, सोबत इतर अधिकारी.

पुणे येथील बैठकीला अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, संचालक योगेश गडकरी (वाणिज्य) व राजेंद्र पवार (मानव संसाधन), प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांचेसह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

नागपूर येथील बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस उपअधीक्षक विजय माहुलकर, उप वन संरक्षक अधिकारी यश काळे, जिल्हा भुसंपादन अधिकारी इंदिरा चौधरी, महानिर्मितीचे मुख्य अभियंता रमेशकुमार ओस्वाल, महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वर्धा येथील बैठकीला जिल्हाधिकारी श्रीमती वान्मथी सी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पराग सोमण, अतिरीक्त जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) अनिल गावीत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# वीजबिलांच्या वसूलीला आणखी वेग द्या

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश



सोलापूर येथील नियोजन भवनात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी पुणे प्रादेशिक विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपस्थित संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, धनंजय औंढेकर.



अकोलेकाटी (ता. उत्तर सोलापूर) उपकेंद्रातील ५ एमव्हीए क्षमतेच्या नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याहस्ते झाले.

**सर्व वीजग्राहकांना** सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा देण्याच्या उपाययोजनांमध्ये कोणतीही हयगय करू नका. पश्चिम महाराष्ट्रात औद्योगिक वसाहतींसह सर्व भागात वीज वितरण यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे वारंवार वीज खंडित होणाऱ्या प्रकारांची गंभीर दखल घेण्यात येत आहे. यासह सेवेच्या कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीतच सेवा देण्यासाठी सजग राहावे आणि वाढती थकबाकी कमी करण्यासाठी वीज बिलांच्या वसूलीला आणखी वेग द्यावा असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

सोलापूर येथील नियोजन भवनात पुणे प्रादेशिक विभागातील परिमंडलाच्या विविध कामे, योजनांचा लोकेश चंद्र यांनी सविस्तर आढावा घेतला. यावेळी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे (प्रकल्प) व धनंजय औंढेकर (पायाभूत आराखडा व विशेष प्रकल्प), सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंते सुनील काकडे (पुणे), धर्मराज पेठकर (बारामती) व स्वप्निल काटकर (कोल्हापूर) उपस्थित होते.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, महावितरणच्या अभियंता व कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट वीजसेवा व ग्राहकसेवा देण्याची क्षमता आहे. अत्यंत खडतर परिस्थितीत ही क्षमता सिद्धही केली आहे. मात्र त्यात आणखी तत्परता व सकारात्मकता अपेक्षित आहे. सर्व ग्राहकांच्या समाधानासाठी सेवेच्या कृती मानकांनुसार कालमर्यादेतच सेवा द्या. ग्राहकांशी समन्वय साधा. पायाभूत यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी स्थानिक आराखडे करून संबंधित कामांना वेग द्यावा. गेल्या काही दिवसांमध्ये वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ताबडतोब उपाययोजना कराव्यात. पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी वीज बंद ठेवण्याचा कालावधी कमी करावा व संबंधित ग्राहकांना एसएमएसद्वारे पूर्वसूचना द्यावी असे निर्देश त्यांनी दिले.

पुणे प्रादेशिक विभागात वीजबिलांच्या थकबाकीमुळे १५ टक्के ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे. परिणामी वीजहानीत वाढ होत आहे. कायमस्वरूपी वीज खंडित असलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्याची मोहीम सुरु करा. वीजचोरी आढळल्यास त्वरीत कारवाई करण्याचे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून येत्या मार्च-२०२६ पर्यंत राज्यातील ५ लाख तर पुणे विभागातील एक लाख घरगुती ग्राहकांकडे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणारी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०', 'मागेल त्याला सौर ऊर्जा कृषिपंप' आदींची प्रभावी अंमलबजावणी करणे व त्याचा ग्राहकांना लाभ मिळवून देण्यासाठी ग्राहक संवाद व प्रबोधन करण्यात यावे अशी सूचना लोकेश चंद्र यांनी केली.

### उद्योजक व एजन्सी संचालकांशी संवाद

सोलापूर जिल्ह्यातील उद्योजकांशी लोकेश चंद्र यांनी विविध मुद्द्यांच्या सादरीकरणातून संवाद साधला. पुढील पाच वर्षांमध्ये लघु व उच्चदाबाच्या औद्योगिक वीज दरात घट होत जाणार आहे अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी उद्योजकांच्या विविध वीज प्रश्नांवर चर्चा करून ते त्वरीत सोडविण्यासाठी स्थानिक यंत्रणेला निर्देश दिले. यासोबतच मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप, सुधारित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस), विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स आदी योजनांच्या कंत्राटदार एजन्सीचे संचालक व प्रतिनिधींची आढावा बैठक घेतली व विविध कामांना वेग देण्याची सूचना केली.

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला आणखी गती द्यावी

सोलापूर जिल्ह्यात १६८८ मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत असून २४२ उपकेंद्रांद्वारे शेतीला दिवसा वीजपुरवठा होणार आहे. सध्या २७९ मेगावॅट क्षमतेचे ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरु आहे. या योजनेच्या कामांना लोकसंवाद व सहकार्यातून आणखी गती द्यावी असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले. सोलापूर येथे टास्क फोर्सची आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी जिल्हाधिकारी गणेश निधळी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) सूर्यकांत भुजबळ, पोलीस निरीक्षक डी. बी. भित्तडे, महाऊर्जाचे जिल्हा व्यवस्थापक प्रसन्न चित्रे, सहाय्यक विद्युत निरीक्षक व. नि. सुतार उपस्थित होते.

### अकोलेकाटी उपकेंद्राच्या नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतील ३३/११ केव्ही अकोलेकाटी उपकेंद्रातील (ता. उत्तर सोलापूर) ५ एमव्हीए क्षमतेच्या नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या करण्यात आले.

# दर्जेदार ग्राहकसेवा, सुरळीत वीजपुरवठ्याला प्राधान्य द्यावे

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश




▸▸ जळगाव येथे कोकण प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे आदी.

**वीज वितरण** यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे नवीन वीजजोडणीसह सर्व ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्यास प्राधान्य द्यावे. सेवेच्या कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीतच सेवा द्यावी. तसेच वीजहानी कमी करून वीजबिलांच्या वसुलीला आणखी वेग द्यावा, असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी कोकण प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

जळगाव येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जळगाव, नाशिक, कल्याण, भांडूप व कोकण परिमंडलातील विविध कामे, योजनांचा लोकेश चंद्र यांनी सविस्तर आढावा घेतला. यावेळी कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, सौर प्रकल्पांचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंता इब्राहिम मुलाणी (जळगाव), सुंदर लटपटे (नाशिक), चंद्रमणी मिश्रा (कल्याण) व संजय पाटील (भांडूप) उपस्थित होते.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, दर्जेदार वीजपुरवठा व ग्राहकसेवा, वीजबिलाची शंभर टक्के वसूली तसेच तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करणे या त्रिसूत्रीनुसार प्राधान्याने काम करावे. गेल्या काही दिवसांमध्ये वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढले आहे. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ताबडतोब उपाययोजना कराव्यात. वारंवार वीजपुरवठा खंडित होणारे भाग ओळखून प्रभावी उपाययोजना करा. पायाभूत यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी स्थानिक आराखडे करून संबंधित कामांना वेग द्यावा. कोकण प्रादेशिक विभागात वीजबिलांच्या थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आलेल्या ग्राहकांची मोठी संख्या आहे. परिणामी वीजहानीत वाढ होत आहे. काही वितरण रोहित्रांवर तर चालू ग्राहकांपेक्षाही कायमस्वरूपी खंडित ग्राहकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे विशेष मोहीम राबवून वीजचोरी आढळल्यास त्वरीत कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**औद्योगिक ग्राहक व एजन्सी संचालकांशी संवाद –** जळगाव जिल्ह्यातील उद्योजकांशी लोकेश चंद्र यांनी विविध मुद्द्यांवर संवाद साधला. यावेळी उद्योजकांच्या विविध वीज प्रश्नांवर चर्चा करून ते त्वरित सोडविण्यासाठी स्थानिक यंत्रणेला निर्देश दिले. यासोबतच मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप, सुधारित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस), विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स आदी योजनांच्या कंत्राटदार एजन्सीचे संचालक व प्रतिनिधींची आढावा बैठक घेतली व विविध कामांना वेग देण्याची सूचना केली.

**टास्क फोर्सची बैठक –** जळगाव जिल्ह्यात ८५० मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यातून १५३ उपकेंद्रांद्वारे शेतीला दिवसा वीजपुरवठा होणार आहे. सध्या ६८ मेगावॅट क्षमतेचे ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. या योजनेच्या कामांना लोकसंवाद व सहकार्यातून आणखी गती द्यावी, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले. जळगाव येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या जिल्हास्तरीय टास्क फोर्सच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यावेळी उपस्थित होते.

**सौर प्रकल्प व पॉवर ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन –** भुसावळ तालुक्यातील वेल्हाळे येथे 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' अंतर्गत ८ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्प व सुधारित वितरण क्षेत्र योजने अंतर्गत भुसावळ शहरातील ३३/११ केव्ही नहाटा उपकेंद्रातील १० एमव्हीए क्षमतेच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन लोकेश चंद्र यांच्या हस्ते झाले.

◆◆●◆◆



▸▸ वेल्हाळे (ता. भुसावळ) येथील सौर ऊर्जा प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे (प्रकल्प) आदी.

# सदोष, नादुरुस्त मीटर तातडीने बदला

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र




लातूर येथे छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.
समवेत सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

**मराठवाड्यात** वीज वितरण यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे सर्व वीज ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्याच्या सेवेत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिला. अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त व सदोष व वीज मीटर तातडीने बदलण्यात यावेत तसेच प्रत्येक महिन्याला वसूलीचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

लातूर येथील शासकीय विश्रामगृहात छत्रपती संभाजीनगर, नांदेड व लातूर परिमंडलातील विविध कामे व योजनांसह प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेचा लोकेश चंद्र यांनी आढावा घेतला. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे (प्रकल्प) व धनंजय औंढेकर (पायाभूत आराखडा व विशेष प्रकल्प), मुख्य अभियंते अरविंद बुलबुले (लातूर), पवनकुमार कछोट (छत्रपती संभाजीनगर), राजाराम माने (नांदेड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, मराठवाड्यात विविध योजनांद्वारे प्रामुख्याने औद्योगिक वसाहती परिसरांसह शहरी व ग्रामीण भागात वीज वितरण यंत्रणेचे जाळे भक्कम करण्यात येत आहेत. ही कामे गतिमान व दर्जेदार होतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा करणे महावितरणची जबाबदारी आहे. यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. काही कारणांनी वीज पुरवठा खंडीत झाल्यास प्रथम पर्यायी स्वरूपात तसेच दुरूस्तीचे काम युध्दपातळीवर करून खंडित विजेचा कालावधी कमीत कमी राहील याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांमध्ये महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. थकबाकी व चालू वीजबिलांचे उद्दिष्ट दरमहा पूर्ण करावे. तसेच जुन्या नादुरुस्त किंवा सदोष वीजमीटरमुळे महावितरणसह ग्राहकांनाही आर्थिक फटका बसतो. त्यामुळे असे जुने मीटर तातडीने बदलावेत. घरगुती ग्राहकांची वीजबिल शुन्यवत करणारी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप आदींची प्रभावी अंमलबजावणी करणे व ग्राहकांना लाभ मिळवून देणे, हे महावितरणमधील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेद्वारे सौरग्राम योजनेला मोठे पाठबळ मिळत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या सहकार्याने या योजनेला आणखी गती द्यावी, असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

**उद्योजकांकडून समाधान व्यक्त** – आढावा बैठकीनंतर लोकेश चंद्र यांनी स्थानिक उद्योजकांशी संवाद साधला. यावेळी वीजसेवा व प्रश्नांबाबत चर्चा झाली. पूर्वीच्या तुलनेत सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा होत असल्याचे नमूद करीत उद्योजकांनी समाधान व्यक्त केले.

**पाडोळी (जिल्हा धाराशिव) येथील ६ मेगावॅट सौर प्रकल्पाचे उद्घाटन**

धाराशिव जिल्ह्यातील पाडोळी (ता. कळंब) येथे क्लिनहेडेज न्यू एनर्जीज प्रा. ली. आणि आदित्य ग्रीन एनर्जी या विकासकांच्या सहाय्याने पूर्ण झालेल्या ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन लोकेश चंद्र यांच्या हस्ते झाले. लातूर जिल्ह्यात २२५ मेगावॅट क्षमतेचे ४६ व धाराशिव जिल्ह्यात २८ मेगावॅट क्षमतेचे ८ सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या दोन्ही जिल्ह्यातील ७२ हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला. पाडोळीतील उपकेंद्रामुळे परिसरातील २१०६ शेतकऱ्यांना फायदा होईल.





धाराशिव जिल्ह्यातील पाडोळी (ता. कळंब) येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार.

# विद्युत सुरक्षा अभियानाचे पाच नवीन विक्रम

## एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान

**शून्य विद्युत** अपघातासाठी जनजागृती अभियानातील विविध उपक्रमांत लोकसहभागाचे महावितरणने नवीन पाच विक्रम नोंदवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या दोन्ही संस्थांच्या वतीने पाचही विक्रमाच्या नोंदीचे प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या संकल्पनेतून विद्युत सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातील लोकसहभागाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतल्याबद्दल त्यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

प्रकाशगड येथे आयोजित कार्यक्रमात एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा मयंक शाह यांनी विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांची घोषणा केली. त्यांनी या दोन्ही संस्थांच्या वतीने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत (मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), स्वाती व्यवहारे (वित्त) यांना प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा सन्मान केला. यावेळी एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा शाह यांनी महावितरणच्या पाचही विक्रमांची माहिती दिली. संचालक राजेंद्र पवार यांनी सांगितले, की 'लोकसहभागातून शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या अभियानाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल.'

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यात सुरक्षा संदेश देणाऱ्या मॅरेथॉनमध्ये ११ हजार ८८१, ऑनलाइन प्रश्नमंजूषेत ९६ हजार १५०, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धेत ७ हजार ५९३, विद्युत सुरक्षेच्या




▸▸ विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांच्या एशिया व इंडिया बुक रेकॉर्डमधील नोंदीचे प्रमाणपत्र संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना परीक्षक कश्मिरा शाह यांनी प्रदान केले.

रॅलीमध्ये २७ हजार १५५ जण सहभागी झाले होते. तसेच दि. ६ जूनला एकाचवेळी ४२ हजार २०१ जणांनी विद्युत सुरक्षेची शपथ घेतली. यासह महावितरणकडून १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या सर्व उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

कार्यक्रमात कार्यकारी संचालक परेश भागवत यांनी अभियानाची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# महावितरणचा 'बिझनेस टायटन्स' पुरस्काराने सन्मान



▸▸ ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी यांच्या हस्ते 'रेडिओ सिटी बिझनेस टायटन्स अवॉर्ड' स्वीकारताना संचालक राजेंद्र पवार व विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट.

**घरगुती वीजग्राहकांना** सुमारे २५ वर्ष मोफत वीजेची सुविधा देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा 'रेडिओ सिटी बिझनेस टायटन्स अवॉर्ड'ने फुकेत (थायलंड) येथे गौरव करण्यात आला.या सन्मानाबद्दल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

'विकसित भारत'चे उद्दिष्ट व भविष्यातील भक्कम अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सुमारे १५० खासगी कंपन्या व सार्वजनिक उपक्रमाच्या कंपन्यांचे संचालक व प्रतिनिधींसाठी फुकेत येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी यांच्या हस्ते महावितरणला पुरस्कार प्रदान करण्यात आला. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार व विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

देशातील १ कोटी घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना जाहीर केली आहे. सुमारे ७५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून स्वतःची वीज निर्मिती करण्यासाठी निवासी कुटुंबांना सक्षम करण्यात येत आहे. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मा. सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात तसेच अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला व महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत २ लाख ४२ हजार ७१४ घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याची क्षमता ९१९ मेगावॅट आहे.

# फिक्कीतर्फे सन्मान




▸▸ फिक्कीकडून देण्यात आलेला पुरस्कार स्वीकारताना मुख्य अभियंता (वीज खरेदी) संदिप पाटील.

**फेडरेशन ऑफ** इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) या उद्योजकांच्या प्रतिष्ठित राष्ट्रीय संस्थेतर्फे आयोजित 'अर्बन चॅलेंज समिट अँड अर्बन इनोव्हेशन्स अवॉर्ड्स २०२५' या पुरस्कार सोहळ्यात नवी दिल्ली येथे महावितरणचा सन्मान करण्यात आला. वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी आर्टिफिशिअल इंटिलिजन्सचा कल्पक वापर केल्याबद्दल हा सन्मान करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महावितरणने ग्राहकांच्या सेवेसाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आहे.

# वीजचोरी अन् वाढती थकबाकी खपवून घेतली जाणार नाही

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश




▸▸ पुणे प्रादेशिक विभागाचा आढावा घेताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी, कार्यकारी संचालक परेश भागवत, प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे.

**मागेल त्यांना वीजजोडणी** उपलब्ध असताना थेट आकडे टाकून किंवा वीज मीटर फेरफार करून वीजचोरी होत असेल तर ती खपवून घेतली जाणार नाही. वीजचोरी विरुद्ध मोहीम आणखी कठोर करा. थेट फौजदारी कारवाई सुरू करा. सोबतच वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला वेग द्या, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

पुणे येथील 'प्रकाशभवन'मध्ये आयोजित पुणे प्रादेशिक विभागातील विविध कामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार , (वाणिज्य) योगेश गडकरी व (मानव संसाधन) राजेंद्र पवार तसेच कार्यकारी संचालक परेश भागवत व दिनेश अग्रवाल, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंते सुनील काकडे (पुणे), धर्मराज पेठकर (बारामती), स्वप्निल काटकर (कोल्हापूर), पंकज तगलपल्लेवार (मुख्यालय) यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकेश चंद्र म्हणाले, की घरगुती, व्यावसायिक व इतर कोणतेही ग्राहक मीटरमध्ये फेरफार करीत असेल तर त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करा. थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केलेल्या ठिकाणी तपासणी करा. थकबाकी वसूलीला आणखी वेग द्यावा. पश्चिम महाराष्ट्रात विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नवीन वीजजोडण्या तसेच वीज भार वाढवून देण्याचे काम विहित मुदतीतच झाले पाहिजे. मागणीप्रमाणे वीज उपलब्ध असताना नवीन वीजजोडण्यांना विलंब होत असल्यास सहन केले जाणार नाही.

**उद्योजकांशी संवाद** – पुणे शहरातील औद्योगिक संघटनांसोबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी संवाद साधला. इतिहासात पहिल्यांदाच आपण औद्योगिक वीजदर कपात केली आहे. दरवर्षी सरासरी १.९ टक्के प्रमाणे पुढील पाच वर्षांमध्ये १० टक्के दर कमी होतील असा विश्वास पुणे येथील उद्योजकांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. एखाद्या उद्योगाच्या अंतर्गत बिघाडामुळे त्या फिडरवरील इतर ग्राहकांनाही खंडित विजेचा फटका बसतो. त्यामुळे उद्योगांनीही 'लोड ब्रेक स्विच'चा वापर करावा. त्यासाठी उद्योगांनीही पुढाकार घ्यावा. हे बसविल्याने ५० टक्के ट्रिपिंग कमी होतील, असे त्यांनी सूचित केले. त्यास उद्योजकांनीही पसंती दर्शवली. ◆◆●◆◆

# मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेला गती द्या

## टास्क फोर्सच्या बैठकांमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश

**मुख्यमंत्री** सौर कृषिवाहिनी योजना २.० मधून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात अनुक्रमे ७७ ठिकाणी एकूण ३२० व १०३ ठिकाणी ६७९ मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या योजनेच्या कामांना आणखी गती द्यावी, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कोल्हापूर व सांगली येथील टास्क फोर्सच्या बैठकांमध्ये दिले.

सांगली जिल्ह्याच्या टास्क फोर्स आढावा बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तृप्ती धोंडमिसे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या स्वतंत्र संचालिका श्रीमती नीता केळकर आदी उपस्थित होते. कोल्हापूर येथील टास्क फोर्सच्या आढावा बैठकीला कार्यकारी संचालक परेश भागवत, सल्लागार श्रीकांत जलतारे, प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी उपस्थित होते.

लोकेश चंद्र यांनी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांसोबत संवाद साधला. तसेच टोप संभापूर (ता. हातकणंगले) येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राचे लोकेश चंद्र यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ◆◆●◆◆




▸▸ सांगली जिल्हा टास्क फोर्स बैठकीत मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत मराविमं सुत्रधारी कंपनीच्या स्वतंत्र संचालिका श्रीमती नीता केळकर व अधिकारी.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)